गोदाम दुरूस्तीच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत सन २०१३-१४ (गोदाम दुरूस्तीची १९ कामे)

# महाराष्ट्र शासन

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

**शासन निर्णय क्रमांकः गोदाम १०११/प्र.क्र.९/नापु-१६ ब,**

**हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,**

**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.**

तारीख: **१५ जून, २०१३.**

**प्रस्तावना —**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राज्यातील शिधापत्रिका धारकांना जीवनावश्यक वस्तूंचे व वितरण करण्यात येते. भारतीय अन्न महामंडळाकडून प्राप्त होणाऱ्या अन्नधान्याची साठवणूक राज्य शासनाच्या गोदामामध्ये केली जाते. धुळे, नंदूरबार, रायगड, सोलापूर, कोल्हापूर, बीड, नांदेड, नागपूर, गोंदीया जिल्हयातील शासकीय गोदामांच्या दुरूस्तीची अंदाजपत्रके जिल्हा पुरवठा कार्यालयांकडून शासनास प्राप्त झालेली आहेत. सदर अंदाजपत्रकांची छाननी करून त्यास प्रशासकीय मंजूरी देण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने सहमती दर्शविली आहे. त्यानुसार गोदाम दुरूस्तीच्या १९ प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

## शासन निर्णय—

रायगड, धुळे, नंदूरबार, सोलापूर, कोल्हापूर, बीड, नांदेड, नागपूर, गोंदीया जिल्हयातील शासकीय गोदाम दुरूस्तींच्या कामास व अंदाजपत्रकास पुढील अटींच्या अधीनतेने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) अंदाजपत्रके संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी साक्षाकित करावीत.

२) अंदाजपत्रके सन २०१०-११ च्या दर सूचीवर अधारीत आहेत.जी अंदाजपत्रके सन २००७-०८ तसेच २००८-०९ च्या दर सूचीवर आधारीत आहेत. त्यात चालू दर सूचीवर आणण्यासाठी योग्य ती तरतूद करण्यात येत आहे.

३) अंदाजपत्रकात आवश्यकतेनुसार विद्युतीकरण, आकस्मिक खर्च ४%, तसेच सेंटेज चार्येस ४% ची तरतूद करण्यात येत आहे.काही अंदाजपत्रकात आवश्यकतेनुसार विद्युतीकरण तसेच बाहय पाणीपुरवठा तसेच सरंक्षक भिंत , अंतर्गत रस्ते इत्यादी तरतूद केल्याचे दिसून येते.

४) सदरील काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात यावे. त्याकरिता आवश्यक निधी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्य़ालयास देण्यात येईल.

५) सदरील गोदाम दुरूस्तीचे काम पूूर्ण होताच त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्याची दक्षता जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी घ्यावी.

६) दुरूस्तीस विलंब अथवा इतर कारणामुळे गोदाम दुरूस्तीस वाढीव खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७) सदर गोदामाच्या दुरूस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर सदरचे काम हे मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे उत्कृष्ट झाल्याबाबतची खातरजमा संबंधीत कार्यकारी अंभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी संयुक्तरित्या करून तसा स्थल निरिक्षण अहवाल तयार करावा व तो अभिलेखामध्ये जतन करून ठेवावा.

८) अंदाजपत्रकातील मुख्य इमारतीच्या व सभोवतालच्या इतर दुरूस्ती कामांच्या आवश्यकतेबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी प्रथमत: खात्री करावी व तदनंतरच प्रत्यक्ष दुरूस्तीचे काम हाती घ्यावे.

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गोदामाचे नाव | कामाचे स्वरूप | अंदाजित खर्च रू. | छाननीअंती अंदाजितखर्च (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | धुळे | शासकीय गोदाम जमनागिरी | शासकीय गोदाम जमनागिरी येथील ५ गोदामांच्या आवारातील रस्त्यांना | ३२५२८४३ | ३२२३००० |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गोदामाचे नाव | कामाचे स्वरूप | अंदाजित खर्च रू. | छाननीअंती अंदाजितखर्च (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कॉक्रीटीकरण करणेबाबत इ. | | |
| २ | नंदूरबार | अक्कलकुवा | शासकीय गोदाम मोलगी | छताचे पत्रे बदलणे, आतील व बोहरील प्लॉस्टर करणे, तळ फरशी बदलणे,खिडक्यांना तावदाने लावणे, लोंखडी शटरचे दरवाजे बदलणे, अंतर्गत दुरूस्ती करणे इ | ११०२६८१ | १२३५८३६ |
| ३ | रायगड | पेण | पेण | व्हॅटीलेटरची दुरूस्ती, शटर दुरूस्ती, फरशी व पत्रे बदलणे, आतून व बाहेरून गिलावा करणे इ. | १६५४१४१ | १६८५३५० |
| ४ | रायगड | पेण | वडखळ | व्हॅटीलेटरची दुरूस्ती, शटर दुरूस्ती, फरशी व पत्रे बदलणे, आतून व बाहेरून गिलावा | ११२८८९३ | ११५०१९१ |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गोदामाचे नाव | कामाचे स्वरूप | अंदाजित खर्च रू. | छाननीअंती अंदाजितखर्च (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | करणे इ. | | |
| ५ | रायगड | | खोपोली-१ | धान्य गोदाम व चौकीदार शेडची दुरूस्ती करणे इ | १६३६००० | १६६४०२७ |
| ६ | रायगड | | खोपोली-२ | धान्य गोदाम व चौकीदार शेडची दुरूस्ती करणे इ. | १३६५००० | १३८८६६६ |
| ७ | रायगड | महाड | महाड गोदाम क्र. २ | जुन्या गोडावूनची दुरूस्ती करणे इ. | ३०२८८१९ | २७२१५४८ |
| ८ | रायगड | | महाड गोदाम क्र.१ | जुन्या गोडाऊनची दुरूस्ती करणे इ. | ४०८२९५२ | ३६६८७३९ |
| ९ | रायगड | | बिरवाडी | जुन्या गोडाऊनची दुरुस्ती करणे इ. | ३१३०५४६ | २८१२९५३ |
| १० | रायगड | मुरूड | मांडला | शासकीय गोदाम दुरूस्ती करणे इ. | १११६५३९ | १११६५३९ |
| ११ | सोलापूर | करमाळा | जेऊर | छताचे पत्रे बदलणे,फरशी दुरूस्ती , सरंक्षण भिंत बांधणे, अंतर्गत रस्त्यांची दुरूस्ती करणे इ. | ३९६३०७६ | ४०००११३ |
| १२ | सोलापूर | | करमाळा | छताचे पत्रे बदलणे, फरशी दुरूस्ती, | २४११८०० | २४३४३४१ |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गोदामाचे नाव | कामाचे स्वरूप | अंदाजित खर्च रू. | छाननीअंती अंदाजितखर्च (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | चौकीदार निवासस्थान बांधणे, अंतर्गत रस्त्यांची दुरूस्ती करणे इ. | | |
| १३ | कोल्हापूर | हातकणंगले | हातकणंगले | पायासाठी खुदाई करणे,आरसीसी कॉलम व बीम घेणे, सीसी हॉलो ब्लॉकचे बांधकाम करणे, रोलींग शटर व व्हेंटीलेटर बदलणे, डाबंरीकरण करणे इ. | १४९२२०० | १५४२२०४ |
| १४ | बीड | केज | केज | गोदामाची किरकोळ दुरूस्ती करणे इ. | ११६५००० | १२५३०७५ |
| १५ | नांदेड | देगलूर | देगलूर | फरशी बदलणे, रोलींग शटर बदलणे, सरंक्षक भिंत बांधणे, गेट बसविणे, रिजलाईन नविन बसविणे, इ. | १८२३३०० | १९२७७४३ |
| १६ | नागपूर | कामठी | कामठी | गोदाम क्र. **२** व **३** ची दुरूस्ती करणेबाबत . | १४७१४८१ | १५८९१९९ |
| १७ | गोंदिया | देवरी | चिंचगड | चौकीदाराचे | ११४१२०० | ११२७२६१ |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गोदामाचे नाव | कामाचे स्वरूप | अंदाजित खर्च रू. | छाननीअंती अंदाजितखर्च (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निवासस्थान बांधणे इ. | | |
| १८ | | अर्जूनी मोर | अर्जूनी मोर | धान्य गोदाम कंपाऊड भिंत बांधणे इ. | २४९४८०० | २५४८८०० |
| १९ | | | नवेगांव बांध | धान्य गोदाम कंपाऊड भिंत बांधणे इ. | १५९३९०० | १५५७६०० |
| | | एकूण | | | ३९०५५१७१ | ३८६४७१८५ |
| | एकूण रू. तीन कोटी शहाऐंशी लाख सत्तेचाळीस हजार एकशे पंच्याऐंशी फ़क्त | | | | | |

वरीलप्रमाणे निधी उपलब्ध करून दिलेल्या शासकीय गोदाम दुरूस्तीचे काम तातडीने सुरू करण्यात येऊन पूर्ण करण्यात यावे. गोदाम दुरूस्ती सुरू झाल्यानंतर प्रथम दुरूस्तीचा संपूर्ण तपशील तसेच संबंधित दुरूस्तीचा दरमहा आढावा घेऊन दुरूर्स्तीची प्रगती जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी शासनास सादर करावी.

सदर गोदामाच्या दुरूस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर सदरचे काम हे मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे उत्कृष्ट झाल्याबाबतची खातरजमा संबंधीत कार्यकारी अंभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी संयुक्तरित्या करून तसा स्थल निरिक्षण अहवाल तयार करावा व तो अभिलेखामध्ये जतन करून ठेवावा.

सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामध्ये व तद्नंतर वेळोवेळी उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून सदर गोदाम दुरूस्तीचा खर्च "मागणी क्रमांक एम-२, मुख्य लेखाशिर्ष २४०८ अन्न साठवण व वखार साठवण, (०३) प्रापण वितरण व किंमत नियंत्रण (०३)(०२) मुफसल, दत्तमत (२४०८ ०१०८) २७ लहान बांधकामे" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

गोदाम दुरूस्तीच्या कामातील अनावश्यक पुनरूक्ती टाळण्याच्या दृष्टीने सदरहू आदेशात नमूद गोदाम दुरूस्तीच्या कामाच्या आवश्यकतेबाबत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी व्यक्तिश: छाननी करावी. गोदाम दुरूस्तीच्या कामातील पुनरूक्ती अथवा विसंगतीबाबत शासनास अवगत करावे, व पुढील आदेशापर्यंत कार्यवाही स्थगित ठेवावी.

वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ च्या भाग-१ उप भाग-५ मधील अनुक्रमांक ३ व १० नुसार तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३४१/इमा-२/दि.३०.१२.२०११ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार सदरचा आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०६१४१६०७४९०१०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Murari Manale

Digitally signed by Ramesh Murari Manale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=FCSCP, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramesh Murari Manale
Date: 2013.06.15 16:39:28 +05'30'

**( रमेश मु. मनाळे )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. उप आयुक्त (पुरवठा), कोकण, नाशिक, औरंगाबाद,पुणे, नागपूर.

२. वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

३. जिल्हाधिकारी/जिल्हा पुरवठा अधिकारी रायगड, धुळे, नंदूरबार, सोलापूर, कोल्हापूर, बीड, नांदेड, नागपूर, गोंदीया

४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागरायगड, धुळे, नंदूरबार, सोलापूर, कोल्हापूर, बीड, नांदेड, नागपूर, गोंदीया

५. जिल्हा कोषागार अधिकारी रायगड, धुळे, नंदूरबार, सोलापूर, कोल्हापूर, बीड, नांदेड, नागपूर, गोंदीया

६. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर.

७. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.

८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई (वित्तीय सल्लागार व उपसचिव मार्फत)

९. वित्त विभाग (व्यय-४, अर्थोपाय व अर्थसंकल्प-३), मंत्रालय, मुंबई.

१०. नियोजन विभाग (का-१४११), मंत्रालय, मुंबई.

११. सहाय्यक संचालक (संगणक), लेखा व कोषागारे, मुंबई/नागपूर.

१२. निवड नस्ती/नापु-१६ब